# न्यूज एक्सप्रेस मराठी

मराठी माध्यम क्षेत्रातील आघाडीचे न्यूज पोर्टल



बातमी व जाहीराती साठी संपर्क साधा!

: ९८३४१३८४८२




# आषाढी वारीसाठी मोठा निर्णय! चिंचवड-निगडी मेट्रोची कामे बंद

## 6 ते 9 जुलैदरम्यान बॅरिकेट्स हटविणार; पालखी मार्गावरील खड्डे बुजवून वारकऱ्यांसाठी सुरक्षित आणि प्रशस्त रस्ता उपलब्ध करणार

**पिंपरी | प्रतिनिधी**

आषाढी वारीच्या पार्श्वभूमीवर पिंपरी-चिंचवड शहरात येणाऱ्या संत तुकाराम महाराज पालखी सोहळ्यातील वारकऱ्यांचा प्रवास सुखकर आणि सुरक्षित व्हावा, यासाठी महापालिकेने मोठा निर्णय घेतला आहे. चिंचवड ते निगडी दरम्यान सुरू असलेली मेट्रोची सर्व कामे आगामी चार दिवस पूर्णपणे बंद ठेवण्यात येणार आहेत. महापालिकेच्या वतीने या संदर्भातील लेखी सूचना महामेट्रो प्रशासनाला दिल्या जाणार आहेत. ६ ते ९ जुलै दरम्यान हा निर्णय लागू राहणार आहे.



मेट्रोच्या कामांमुळे निगडी ते चिंचवड दरम्यान रस्त्याच्या मध्यभागात मोठ्या प्रमाणावर बॅरिकेटिंग करण्यात आले आहे. मात्र, आषाढी वारी पालखी सोहळ्यादरम्यान भक्ती-शक्ती चौक येथून आकुर्डी येथील मुक्कामाकडे जाताना लाखो वारकरी या मार्गावरून मार्गक्रमण करतात. वारकऱ्यांची गर्दी लक्षात घेता, मार्गावरील मेट्रोचे रस्त्यावरील बॅरिकेट्स तात्पुरते काढून घेतले जातील. रस्ता किमान सहा मीटरपेक्षा मोठा ठेवण्यात येणार आहे. पालखी मार्ग रिकामा करून किमान सहा मीटरपेक्षा जास्त रुंदीचा रस्ता पादचारी वारकऱ्यांसाठी उपलब्ध करून दिला जाणार आहे.

पावसाळ्याचे दिवस असल्याने या मुख्य रस्त्यावर अनेक ठिकाणी खड्डे पडले आहेत. वारीमध्ये अनवाणी चालणाऱ्या वारकऱ्यांना इजा होऊ नये, म्हणून महापालिका प्रशासन तातडीने ॲक्शन मोडमध्ये आले आहे. या चार दिवसांत रस्त्यावरील सर्व खड्डे बुजवून तातडीने डांबरीकरण (पॅचवर्क) केले जाईल. तसेच रस्ता पूर्णपणे समपातळीत आणला जाईल, जेणेकरून वृद्ध आणि लहान मुलांना चालताना कोणताही त्रास होणार नाही.

> **भक्ती-शक्ती ते चिंचवड एम्पायर इस्टेट या मार्गावर सुरू असलेल्या मेट्रोच्या कामामुळे मोठे खांब आणि बॅरिकेटींगमुळे रस्ता अरुंद झाला आहे. त्यामुळे बॅरिकेटींग आतमध्ये सरकविणे, पालखी मार्गातील अडथळे दूर करणे, आवश्यक ठिकाणी मजबूत संरक्षक जाळ्या उभारणे आणि राडारोडा हटवून रस्ता समतल करण्याच्या सूचना महामेट्रोच्या अधिकाऱ्यांना सूचना दिल्या आहेत. चार दिवस मेट्रोची कामे देखील बंद करण्यात येणार आहेत.**
>
> **- बापूसाहेब गायकवाड, सहशहर अभियंता, महापालिका**

मेट्रोच्या अर्धवट कामांच्या ठिकाणी किंवा धोकादायक वळणावर वारकरी जाऊ नयेत, यासाठी विशेष काळजी घेतली जात आहे. संपूर्ण पालखी मार्गावर मेट्रो प्रशासन आणि महापालिकेच्या वतीने अतिरिक्त सुरक्षारक्षक तैनात केले जातील. हे रक्षक २४ तास वारकऱ्यांना दिशा दाखवण्याचे आणि सुरक्षेचे काम करतील.

महापालिका हद्दीत भक्ती-शक्ती चौकात पालखीचे आगमन झाल्यानंतर ती आकुर्डीतील विठ्ठल मंदिर मुक्कामाकडे रवाना होते. हा संपूर्ण पट्टा अत्यंत गजबजलेला आहे. महापालिका आयुक्तांच्या मार्गदर्शनानुसार, वारकऱ्यांना कुठेही अडचण किंवा अडथळा येऊ नये, यासाठीच ६ ते ९ जुलै या कालावधीत मेट्रोची कामे थांबवण्याचे आदेश देण्यात येत आहेत. याशिवाय पिण्याचे पाणी, फिरती शौचालये आणि वैद्यकीय पथकांचीही ठिकठिकाणी व्यवस्था करण्यात आली आहे.

---

# पिंपरी-चिंचवडमध्ये धोकादायक झाडांचा धोका; 15 ठिकाणी झाडे कोसळली

## संततधार पावसामुळे अनेक झाडे उन्मळून पडली; शाळा, चौक व रस्त्यांवरील धोकादायक झाडांबाबत तातडीच्या कारवाईची मागणी

**पिंपरी | प्रतिनिधी**

पिंपरी-चिंचवड शहर परिसरात गेल्या तीन दिवसांपासून संततधार पावसाने हजेरी लावली असून, अनेक ठिकाणी झाडे उन्मळून पडण्याच्या घटनाही घडल्या आहेत. या घटनांमध्ये कोणतेही नुकसान झाले नाही; मात्र अजूनही अनेक ठिकाणी धोकादायक स्थितीतील झाडे उन्मळून अपघाताची शक्यता नाकारता येत नाही. असे असूनही याकडे पालिकेच्या संबंधित विभागाचे दुर्लक्ष होत असल्याचे दिसून येत आहे.



शाळांच्या परिसरात, मुख्य चौकांमध्ये, रस्त्यालगत, गर्दीच्या ठिकाणी आणि वाहनतळांमध्ये उभी असलेली अनेक झाडे उन्मळून कोसळण्याच्या स्थितीत आहेत. काही झाडे एका बाजूला धोकादायकरीत्या झुकलेली, काहींची मुळे जमिनीबाहेर आलेली, तर काहींच्या जड फांद्या थेट पादचारी मार्गावर लोंबकळत आहेत.

ही परिस्थिती एखाद्या नैसर्गिक संकटामुळे नव्हे, तर दुर्लक्षामुळे निर्माण झाल्याचे शहरभर केलेल्या प्रत्यक्ष पाहणीत समोर आले. दरवर्षी पावसाळ्यात झाडे उन्मळून पडतात, वाहनांचे नुकसान होते, नागरिक जखमी होतात, काही वेळा जीवही जातात, अशा घटना घडूनही पालिकेच्या संबंधित विभागाचे दुर्लक्ष होत असल्याने नागरिकांतून नाराजी व्यक्त केली जात आहे.

### पंधरा ठिकाणी झाडे पडण्याच्या घटना

» **पिंपरी-चिंचवड शहर परिसरात परिसरात १५ ठिकाणी झाडे पडण्याच्या घटना घडल्या. निगडी पोलिस स्टेशन, कुणाल आयकॉन रोड पिंपळे सौदागर, त्रिवेणीनगर निगडी, स्वामी मंदिर किवळे गावठाण, गुळवेवस्ती भोसरी, इंद्रायणीनगर भोसरी, खराळवाडी पिंपरी, चक्रपाणी वसाहत भोसरी, आरटीओ ऑफिस मोशी, शास्त्रीनगर कासारवाडी, टिळक हॉटेल दापोडी, नाशिक फाटा कासारवाडी, खंडोबामाळ आकुर्डी, केशवनगर चिंचवड, मयुर इस्टेट वाकड.**

# महावितरणच्या पुनर्रचनेमुळे नवीन वीज जोडणीला ब्रेक..

## प्रक्रिया सुलभ करण्यासाठी महावितरण सदस्य संतोष सौंदणकर यांचा पुढाकार..

**पिंपरी | प्रतिनिधी**

देहू-आळंदी पालखी सोहळ्यानिमित्त महावितरणकडून आयोजित करण्यात आलेल्या आढावा बैठकीसाठी महावितरणचे प्रकाशगड, वांद्रे (मुंबई) येथील नवनियुक्त संचालक (संचालन) धनंजय औंढेकर पुणे दौऱ्यावर आले होते. यावेळी पुणे जिल्हा विद्युत सनियंत्रण समितीचे सदस्य संतोष रमाकांत सौंदणकर यांनी त्यांची भेट घेत त्यांच्या नियुक्तीबद्दल त्यांचे अभिनंदन करीत त्यांना माऊलींची मूर्ती देऊन त्यांचे स्वागत केले. तसेच महावितरणच्या पालखी सोहळा आढावा बैठकीस उपस्थित राहण्याचा नवा पायंडा त्यांच्यामुळेच आज अधोरेखित झाला. त्याबद्दल त्यांचे कौतुक केले.

दरम्यान सप्टेंबर २०२५ पासून महावितरणमध्ये लागू करण्यात आलेल्या पुनर्रचना धोरणामुळे नवीन वीज जोडणी प्रक्रियेत निर्माण झालेल्या अडचणींबाबत सविस्तर निवेदन सादर करत ग्राहकांना दिलासा देण्यासाठी तातडीने उपाययोजना करण्याची मागणी संतोष सौंदणकर यांनी निवेदनाद्वारे त्यांच्याकडे केली.

संतोष सौंदणकर यांनी दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, महावितरणने सप्टेंबर २०२५ पासून अंतर्गत प्रशासकीय पुनर्रचना लागू केली. या पुनर्रचनेनुसार 'बिलिंग अँड रेव्हेन्यू विभाग' आणि 'ऑपरेशन अँड मेंटेनन्स विभाग' यांचे स्वतंत्र कार्यविभाजन करण्यात आले. या बदलाचा सर्वाधिक परिणाम नवीन वीज जोडणी घेणाऱ्या ग्राहकांवर झाला असून, पूर्वीपेक्षा प्रक्रिया अधिक गुंतागुंतीची, वेळखाऊ आणि त्रासदायक बनली आहे.



### महावितरणकडे चार प्रमुख मागण्या

» संतोष सौंदणकर यांनी महावितरण प्रशासनाकडे चार महत्त्वाच्या मागण्या केल्या आहेत. त्यामध्ये सध्याच्या पुनर्रचना धोरणाचा तातडीने आढावा घेऊन त्यामधील त्रुटी दूर कराव्यात, पूर्वीची सेक्शननिहाय कार्यपद्धती शक्य असल्यास पुन्हा लागू करावी, पर्यायी स्वरूपात बिलिंग आणि महसूल विभागातील सक्षम अधिकाऱ्यांना नवीन वीज जोडणी मंजूर करून कोटेशन जारी करण्याचे अधिकार द्यावेत तसेच नवीन वीज जोडणीसाठी 'सिंगल विंडो सिस्टम' सुरू करून सर्व प्रक्रिया एकाच कार्यालयातून पूर्ण करण्याची व्यवस्था निर्माण करावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

पूर्वी सेक्शननिहाय कार्यपद्धती अस्तित्वात होती. नवीन वीज जोडणीसाठी आलेला अर्ज एकाच कार्यालयातून आणि संबंधित जबाबदार अधिकाऱ्याच्या नियंत्रणाखाली निकाली काढला जात होता. त्यामुळे ग्राहकांना कमी वेळेत सेवा मिळत होती. कोणत्याही प्रकारचा अनावश्यक विलंब होत नव्हता आणि ग्राहकांना विविध कार्यालयांमध्ये हेलपाटे मारण्याची वेळ येत नव्हती.

मात्र, सध्याच्या पुनर्रचनेनंतर ग्राहकाने नवीन वीज जोडणीसाठी अर्ज केल्यानंतर त्याची प्रथम बिलिंग आणि महसूल विभागाकडून तपासणी केली जाते. त्यानंतर संबंधित अर्ज संगणकीय प्रणालीद्वारे ऑपरेशन व मेंटेनन्स विभागातील सहाय्यक अभियंत्यांकडे पाठविला जातो. काही प्रकरणांमध्ये कार्यकारी अभियंत्यांची मंजुरी आवश्यक असते. त्यानंतर अर्ज पुन्हा बिलिंग विभागाकडे परत येतो आणि सर्व मंजुरी पूर्ण झाल्यानंतरच संबंधित ग्राहकासाठी डिमांड नोट अथवा कोटेशन तयार केले जाते. या संपूर्ण प्रक्रियेमध्ये अनेक स्तरांवर मंजुरी घ्यावी लागत असल्याने अर्ज निकाली निघण्यास मोठा विलंब होत आहे.

या विलंबामुळे ग्राहकांना आपल्या अर्जाची स्थिती जाणून घेण्यासाठी वारंवार महावितरणच्या विविध कार्यालयांमध्ये जावे लागत आहे. प्रत्येक विभागाकडून दुसऱ्या विभागाकडे पाठविण्यात येणाऱ्या प्रक्रियेमुळे नागरिकांचा वेळ, श्रम आणि आर्थिक खर्च वाढत असून ग्राहकांमध्ये नाराजीचे वातावरण निर्माण झाले आहे. शहरांबरोबरच ग्रामीण भागातील ग्राहकांनाही या प्रक्रियेचा मोठा फटका बसत असल्याचे निवेदनात सौंदणकर यांनी नमूद केले आहे.

> "मागणीनुसार सकारात्मक विचार केला आहे. पुढील महिन्यात याबाबत बैठकीचे आयोजन करून त्यातील त्रुटी दुर केल्या जातील. संबंधित स्तरावर आवश्यक कार्यवाहीबाबत सूचना देण्यात येतील."
>
> - मा. धनंजय औंढेकर, संचालक (संचालन) - महावितरण प्रकाशगड, वांद्रे (मुंबई

> "वरील सुधारणा अमलात आल्यास नवीन वीज जोडणीसाठी लागणारा कालावधी कमी होईल, ग्राहकांना वारंवार कार्यालयांचे हेलपाटे मारावे लागणार नाहीत, प्रशासकीय पारदर्शकता वाढेल आणि महावितरणची ग्राहकाभिमुख प्रतिमा अधिक बळकट होईल, संतोष सौंदणकर यांनी व्यक्त केला."
>
> - मा. संतोष रमाकांत सौंदणकर, सदस्य - पुणे जिल्हा विद्युत नियंत्रण समिती..

# एसटी स्मार्ट कार्ड नोंदणी शिबिरास उत्स्फूर्त प्रतिसाद

## नगरसेविका कविता भोंगाळे-पाटील यांच्या पुढाकाराने शिबिर संपन्न नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**पिंपरी | प्रतिनिधी**

नागरिकांना शासनाच्या विविध कल्याणकारी योजनांचा लाभ उपलब्ध करून देण्यासाठी भोसरी येथील प्रभाग क्रमांक ५ मध्ये 'ST स्मार्ट कार्ड (NCMC)' नोंदणी शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. हे महत्त्वपूर्ण शिबिर दिघी रोड येथील सिद्धेश्वर हायस्कूलजवळ असलेल्या विदर्भमित्र मंडळ येथे पार पडले. या शिबिराच्या पाभ घेत परिसरातील अनेक नागरिकांनी एसटी स्मार्ट कार्ड प्राप्त करण्यासाठी नोंदणी केली. नगरसेविका सौ. कविता भोंगाळे-पाटील यांच्या पुढाकारातून हे शिबिर घेण्यात आले.

यावेळी नगरसेवक सागर भैया गवळी, मंडल अध्यक्ष रोहिणी ताई मांढरे, माजी मंडल अध्यक्ष रवींद्र नांदुरकर, प्रभाग अध्यक्ष स्वातीताई शिर्के, प्रभाग उपाध्यक्ष मनिषा ताई गंगणे, सुधाकर वसे, सांगळे गुरुजी आणि कल्पना धाडसे उपस्थित होते.



शिबिरामध्ये प्रामुख्याने १३ वर्षांवरील महिला तसेच ६० वर्षांवरील ज्येष्ठ पुरुष यांची शासकीय नियमानुसार विहित शुल्क आकारून नोंदणी करण्यात आली. नोंदणी प्रक्रियेसाठी नागरिकांना आधार कार्ड आणि आधार क्रमांकाशी संलग्न असलेला मोबाईल क्रमांक सोबत आणणे आवश्यक करण्यात आले होते, जेणेकरून डिजिटल प्रमाणीकरण वेगाने पूर्ण होऊ शकले.

या नवीन एनसीएमसी स्मार्ट कार्डमुळे नागरिकांना एसटी बस, मेट्रो तसेच इतर सर्व सार्वजनिक वाहतूक सेवांचा लाभ केवळ एकाच कार्डाद्वारे घेता येणार आहे. विशेष म्हणजे हे कार्ड आधार आणि UDID लिंकिंगसह जोडलेले असल्याने अत्यंत सुरक्षित डिजिटल व्यवहाराची सुविधाही याद्वारे उपलब्ध होणार आहे, ज्यामुळे प्रवाशांचा प्रवास अधिक सोयीस्कर आणि आधुनिक होणार आहे.

> सर्वसामान्य नागरिकांना शासकीय योजनांसाठी वारंवार हेलपाटे मारावे लागू नयेत, हाच या शिबिरामागील आमचा मुख्य प्रयत्न होता. त्यामुळेच प्रभागातील सर्व पात्र महिला आणि ज्येष्ठ नागरिकांनी या सुविधेचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहनही केले होते. या शिबिराला परिसरातील नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. लोकाभिमुख उपक्रम राबवण्याचा आमचा सातत्याने प्रयत्न असेल.
>
> - कविता भोंगाळे-पाटील, नगरसेविका



# आजी-माजी नगरसेवकांच्या वैद्यकीय योजनेचा विस्तार

## शिक्षण मंडळ व पीएमपीएमएलच्या आजी-माजी सदस्यांनाही लाभ; वार्षिक खर्च 5 कोटींवरून 10 ते 12 कोटी रुपयांपर्यंत वाढण्याची शक्यता

**पुणे | प्रतिनिधी**

शहरातील आजी- माजी नगरसेवकांच्या वैद्यकीय उपचारावर महापालिका दरवर्षी ५ कोटींचा खर्च करत आहे. दरवर्षी ३५० हून अधिक आजी-माजी नगरसेवक प्रत्येक वर्षी वैद्यकीय उपचाराची बिले सादर करत आहेत. यातच स्थायी समितीने शिक्षण मंडळाचे आजी-माजी सदस्य, तसेच पुणे महानगर परिवहन महामंडळाचे (पीएमपीएमएल) आजी-माजी सदस्य आणि त्यांच्या कुटुंबीयांचाही समावेश केल्याने या योजनेसाठी पालिकेला वर्षाला १० ते १२ कोटींचा खर्च करावा लागेल.

महापालिका निवडणुका झाल्यानंतर गेल्या चार महिन्यांत २२७ आजी-माजी नगरसेवकांनी वैद्यकीय उपचाराच्या अंशदायी वैद्यकीय सहाय्य योजनेत नोंदणी केली आहे. या योजनेत विद्यमान नगरसेवक आणि त्यांच्या कुटुंबातील सदस्यांना वैद्यकीय उपचाराचा १०० टक्के खर्च दिला जातो. माजी नगरसेवकांनाही मोफत उपचार दिले जातात. नगरसेवकाचा मृत्यू झाल्यानंतर कुटुंबियांना कोणतेही लाभ दिले जात नाहीत.

काही दिवसांपूर्वी स्थायी समितीने योजनेत शिक्षण मंडळाचे आजी-माजी सदस्य, तसेच पुणे महानगर परिवहन महामंडळ (पीएमपीएमएल)चे आजी-माजी सदस्य आणि त्यांच्या कुटुंबीयांना योजनेचा लाभ कायम स्वरूपी देण्याचा निर्णय घेतला आहे. त्यामुळे या योजनेचा खर्च जवळपास दुपटीने वाढणार आहे.

पालिकेच्या आरोग्य विभागाच्या माहितीनुसार नगरसेवकांच्या उपचारासाठी दरवर्षी सरासरी ५ कोटींचा खर्च होतो. आता इतर पदाधिकारी, तसेच कुटूंबियांनाही कायम स्वरूपी उपचार मिळणार आहेत. त्यामुळे योजनेचा खर्च दुपटीने वाढण्याची शक्यता आहे. त्यासाठी अंदाजपत्रकात तरतूद नसल्याने वर्गीकरणाद्वारे हा निधी उपलब्ध करून द्यावा लागेल. नव्या प्रस्तावाची अंमलबजावणी करायची झाल्यास या योजनेसाठी वर्षाला १० ते १२ कोटींचा खर्च होईल.

स्थायी समितीत नगरसेवकांच्या मृत्यूनंतरही त्यांच्या कुटूंबियांना कायम स्वरूपी उपचार मिळावेत, असा प्रस्ताव ठेवला होता. प्रशासनाने आक्षेप घेतल्याने तो आरोग्य विभागाच्या अभिप्रायासाठी पाठविला. या प्रस्तावाची अंमलबजावणी उचित नसल्याचा अभिप्राय दिला असून तो आयुक्तांच्या मान्यतेसाठी ठेवला आहे. अद्याप तो स्थायी समितीकडे पाठविलेला नाही. यातच नवीन प्रस्ताव स्थायी समितीने तातडीनं मान्य करत प्रशासनाला अंमलबजावणीच्या सूचना केल्या आहे.




### वैद्यकीय योजनेवर पालिकेचा ५ कोटींचा वार्षिक खर्च

» पुणे महापालिकेच्या अंशदायी वैद्यकीय सहाय्य योजनेअंतर्गत शहरातील आजी-माजी नगरसेवकांच्या वैद्यकीय उपचारांवर दरवर्षी सुमारे पाच कोटी रुपये खर्च केले जात आहेत. दरवर्षी ३५० हून अधिक आजी-माजी नगरसेवक उपचारांची बिले सादर करतात. सध्या विद्यमान नगरसेवक आणि त्यांच्या कुटुंबीयांना १०० टक्के वैद्यकीय खर्चाची सुविधा दिली जाते. माजी नगरसेवकांनाही या योजनेचा लाभ मिळतो, मात्र त्यांच्या निधनानंतर कुटुंबीयांना सध्या कोणताही लाभ दिला जात नाही..

### योजनेत नव्या लाभार्थ्यांचा समावेश

» स्थायी समितीने शिक्षण मंडळाचे आजी-माजी सदस्य तसेच पीएमपीएमएलचे आजी-माजी सदस्य आणि त्यांच्या कुटुंबीयांनाही अंशदायी वैद्यकीय सहाय्य योजनेचा कायमस्वरूपी लाभ देण्याचा निर्णय घेतला आहे. या निर्णयामुळे लाभार्थ्यांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढणार असून महापालिकेवरील आर्थिक भारही वाढण्याची शक्यता आहे. प्रशासनाला या विस्तारित योजनेची अंमलबजावणी करण्यासाठी अतिरिक्त निधीची तरतूद करावी लागणार आहे.

### खर्च वाढून १२ कोटींपर्यंत जाण्याची शक्यता

» पालिकेच्या आरोग्य विभागाच्या अंदाजानुसार सध्या या योजनेवर वार्षिक पाच कोटी रुपये खर्च होतो. नव्या निर्णयामुळे हा खर्च वाढून १० ते १२ कोटी रुपयांपर्यंत पोहोचण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. या खर्चासाठी अंदाजपत्रकात स्वतंत्र तरतूद नसल्याने वर्गीकरणाद्वारे निधी उपलब्ध करावा लागेल. दरम्यान, दिवंगत नगरसेवकांच्या कुटुंबीयांनाही कायमस्वरूपी वैद्यकीय लाभ देण्याचा प्रस्ताव अद्याप प्रशासनाच्या स्तरावर प्रलंबित आहे.

# खडकवासला धरणसाखळीत वाढला महिनाभराचा पाणीसाठा

## पाटबंधारे विभागाची आकडेवारी जाहीर; टेमघरमध्ये पहिल्यांदाच पाणी जमा, खडकवासला आणि पानशेतची ताजी स्थिती स्पष्ट.

**पुणे | प्रतिनिधी**

शहराला पाणीपुरवठा करणाऱ्या खडकवासला धरणसाखळीतील चारही धरणांच्या पाणलोट क्षेत्रात शनिवारी दिवसभर पावसाने हजेरी लावली. यामुळे पाणीसाठ्यात वाढ सुरूच असून मागील तीन दिवसांत धरणात महिनाभराचा पाणीसाठा वाढला आहे. शहरातील पालखी सोहळ्यासाठी महापालिकेने दोन दिवस पाणीकपात रद्द केलेली आहे. वाढलेल्या पाणीसाठ्याने महापालिकेस दिलासा मिळाला आहे.

घाटमाथ्यावर सुरू असलेल्या पावसामुळेही पाणीसाठ्यात लक्षणीय वाढ झाली आहे. पाटबंधारे विभागाच्या माहितीनुसार, शनिवारी दिवसभरात खडकवासला धरणाच्या पाणलोट क्षेत्रात १३ मिमी पावसाची नोंद झाली. पानशेत धरणाच्या पाणलोट क्षेत्रात ३३ मिमी, वरसगाव धरण परिसरात ३० मिमी तर टेमघर धरणाच्या पाणलोट क्षेत्रात ५५ मिमी पावसाची नोंद झाली. यंदाच्या पावसाळ्यात पहिल्यांदाच टेमघर धरणातही पाणी साठण्यास सुरूवात झाली.

शहरास महिन्यासाठी १ टीएमसी पाणी लागते. या चारही धरणांच्या पाणलोट क्षेत्रात तीन दिवसांपूर्वी ३.५७ टीएमसी पाणीसाठा होता. तो वाढून पावसामुळे ४.६८ टीएमसी झाला आहे. त्यामुळे तीनच दिवसात जवळपास एक टीएमसी पाणी वाढले असून शहराला ते महिनाभर पुरेल एवढे आहे. मात्र, मागील वर्षाच्या तुलनेत हा पाणीसाठा जवळपास १३ टीएमसीने कमी आहे. मागील वर्षी हा पाणीसाठा १८ टीएमसी होता. त्या तुलनेत हा पाणीसाठा कमी असला तरी जुलै महिन्यात समाधानकारक पाणीसाठा तयार होण्याची अपेक्षा आहे.



### तीन दिवसांत महिनाभराचा पाणीसाठा वाढला

» खडकवासला धरणसाखळीतील चारही धरणांच्या पाणलोट क्षेत्रात झालेल्या पावसामुळे अवघ्या तीन दिवसांत सुमारे एक टीएमसी पाणीसाठ्याची वाढ झाली आहे. शहराला महिनाभरासाठी साधारण एक टीएमसी पाण्याची आवश्यकता असल्याने ही वाढ पुण्याच्या पाणीपुरवठ्यासाठी दिलासादायक ठरली आहे. सध्या धरणसाखळीत ४.६८ टीएमसी पाणीसाठा उपलब्ध असून, मागील वर्षीच्या तुलनेत तो सुमारे १३ टीएमसीने कमी आहे. तरीही जुलै महिन्यात समाधानकारक पाऊस झाल्यास पाणीसाठ्यात आणखी वाढ होऊन शहराच्या पाणीपुरवठ्याची चिंता मोठ्या प्रमाणात कमी होण्याची अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# पालखी सोहळ्यात एआय दिंडीचा उत्साह

## आळंदी ते पंढरपूर वारीत एआय दिंडीचा सहभाग; नोकरी व आरोग्य कारणांमुळे पूर्ण वारी न करू शकणाऱ्यांसाठीही विशेष व्यवस्था

**पुणे | प्रतिनिधी**

गेल्या काही वर्षांपासून पालखी सोहळ्यात सहभागी होणाऱ्या आयटी दिंडीबद्दल आपल्याला माहिती आहेच. यंदाही आयटी दिंडीचा प्रवास संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज यांच्या पालखीत आळंदी ते पुणे असा असणार आहे. मागील वर्षापासून सुरू केलेल्या ऑल इन्क्लुसिव्ह दिंडी म्हणजेच एआय दिंडी (सर्वसमावेशक दिंडी) यंदाही आयोजित केली आहे.

पंढरपूरची वारी अधिकाधिक लोकांपर्यंत पोहचविण्याच्या उद्देशाने 'एआय दिंडी' (आयटी दिंडी संलग्न) यंदाही आळंदी ते पंढरपूर असा प्रवास पालखी सोहळ्यात करणार आहे. समाजातील प्रत्येकाला वारीचा अनुभव घेता यावा, या संकल्पनेतून सुरू झालेल्या या उपक्रमाला यंदा देश-विदेशातील नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळत आहे.

यंदा आयटी दिंडी आणि एआय दिंडी मिळून पाच हजारांहून अधिक वारकरी सहभागी होणार आहेत. आयआयटीयन्सची दिंडी सुरू आहेच. पण, या दिंडीबरोबर एआय दिंडीही निघणार आहे. संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळ्यात आळंदी ते पंढरपूर या संपूर्ण मार्गावर 'एआय दिंडी' सहभागी होणार असून, दिंडी क्रमांक २५ म्हणून रथापुढे या दिंडीचा सहभाग असेल.

तसेच, जगद्गुरू संत श्री तुकाराम महाराज पालखी सोहळ्यात देहू ते आकुर्डी या टप्प्यातही एआय दिंडी सहभागी होणार आहे. यंदा आयटी दिंडी आणि एआय दिंडीत आयटीसह विविध क्षेत्रांतील व्यक्ती सहभागी होतील. या उपक्रमाचे नियोजन मागील तीन महिन्यांपासून सुरू असून, संपूर्ण वारीदरम्यान वारकऱ्यांना आवश्यक त्या प्राथमिक सुविधा उपलब्ध करून देण्यावर भर देण्यात येत आहे.

आयटी आणि एआय दिंडीचे सचिन झापकर म्हणाले की, पूर्ण वारी पायी करण्याची इच्छा असलेल्या वारकऱ्यांसाठी एआय दिंडी हा एक सुव्यवस्थित पर्याय ठरत आहे. मात्र, नोकरीतील सुट्टीची अडचण किंवा वैद्यकीय कारणांमुळे संपूर्ण वारी चालणे शक्य नसलेल्या वारकऱ्यांसाठीही विशेष व्यवस्था केली आहे. अशा वारकऱ्यांना रोज पुण्यातून सकाळी बसने त्या दिवसाच्या वारीच्या प्रारंभस्थळी नेले जाईल आणि संबंधित टप्पा पूर्ण झाल्यानंतर सायंकाळी पुन्हा पुण्यात परत आणण्याची व्यवस्था करण्यात येणार आहे. त्यामुळे अनेक वारकरी दरवर्षी एक किंवा दोन टप्प्यांमध्ये सहभागी होत पंढरपूरपर्यंतचा वारीचा अनुभव घेणार आहेत.






### नोकरी करणाऱ्या वारकऱ्यांसाठी विशेष सुविधा

» पूर्ण वारी पायी करता न येणाऱ्या वारकऱ्यांसाठी एआय दिंडीने विशेष व्यवस्था केली आहे. नोकरीतील सुट्टीची अडचण किंवा आरोग्याच्या कारणांमुळे संपूर्ण वारी शक्य नसलेल्या भाविकांना दररोज पुण्यातून बसने त्या दिवसाच्या पालखीच्या प्रारंभस्थळी नेण्यात येईल. संबंधित टप्पा पूर्ण झाल्यानंतर सायंकाळी त्यांना पुन्हा पुण्यात आणले जाईल. त्यामुळे अनेक भाविकांना एक किंवा दोन टप्प्यांमध्ये सहभागी होत वारीचा आध्यात्मिक अनुभव घेण्याची संधी उपलब्ध होणार आहे.

### एआय दिंडी'ची सर्वसमावेशक संकल्पना

» गेल्या वर्षी सुरू झालेली 'एआय दिंडी' (ऑल इन्क्लुसिव्ह दिंडी) यंदाही संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराजांच्या पालखी सोहळ्यात आळंदी ते पंढरपूर या संपूर्ण प्रवासात सहभागी होणार आहे. समाजातील प्रत्येक घटकाला वारीचा अनुभव घेता यावा, या उद्देशाने हा उपक्रम राबविला जात आहे. यंदा देश-विदेशातील वारकऱ्यांनीही या दिंडीत सहभागी होण्यासाठी उत्स्फूर्त प्रतिसाद दिला आहे. दिंडी क्रमांक २५ म्हणून रथापुढे 'एआय दिंडी'चे स्थान निश्चित करण्यात आले आहे.

### पाच हजारांहून अधिक वारकऱ्यांचा सहभाग

» यंदा आयटी दिंडी आणि एआय दिंडी मिळून पाच हजारांहून अधिक वारकरी वारीत सहभागी होणार आहेत. आयटी क्षेत्रासह विविध व्यवसायांतील नागरिक या दिंडीत सहभागी होत आहेत. गेल्या तीन महिन्यांपासून या उपक्रमाचे नियोजन सुरू असून, संपूर्ण वारीदरम्यान वारकऱ्यांना निवास, भोजन, वैद्यकीय मदत आणि इतर आवश्यक सुविधा उपलब्ध करून देण्यावर विशेष भर देण्यात आला आहे. देहू ते आकुर्डी या टप्प्यात संत तुकाराम महाराजांच्या पालखी सोहळ्यातही एआय दिंडी सहभागी होणार आहे.

# 'एचएसआरपी ' नंबर प्लेट नसेल तर 'इतके' रुपये दंड; आरटीओची कारवाई सुरू

## पुणे आरटीओ अंतर्गत 26 लाख वाहनांपैकी केवळ 9 लाख वाहनांनाच बसली नंबर प्लेट; अजूनही लाखो वाहनचालक दंडाच्या कचाट्यात येण्याची शक्यता

**पुणे | प्रतिनिधी**

सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार १ एप्रिल २०१९ पूर्वीच्या सर्व जुन्या वाहनांना हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन नंबर प्लेट (एचएसआरपी) बसविणे बंधनकारक आहे. त्याबाबत राज्य परिवहन विभागाकडून मागील दीड वर्षात सहा वेळा मुदतवाढ दिली. त्यामध्ये ३० जून ही अंतीम मुदत संपली असून, मुदत संपताच पुणे प्रादेशिक परिवहन कार्यालयाच्या वायुवेग पथकाने आणि वाहतूक पोलिसांनी संयुक्तपणे शहरात विना एचएसआरपी प्लेट असलेल्या वाहनांवर दंडात्मक कारवाई करण्यास सुरवात केली.

१ जुलैपासून सुरू कारवाई सुरू करण्यात आली असून अशा वाहन चालकांकडून प्रत्येकी एक हजार रुपये दंड आकारण्यात येत आहे. पुणे शहरात आजही १४ लाख ५० हजार वाहने विना एचएसआरपी धावत आहेत. त्यामुळे एचएसआरपी नसलेल्या वाहनांची आरटीओ कार्यालयातील मालकी हस्तांतरण, पत्ता बदलणे, कर्जबोजा चढवणे/उतरवणे आणि परवाना नूतनीकरण यांसारख्या महत्त्वाच्या सेवा बंद होणार आहेत.

ज्या वाहनधारकांनी ३० जून किंवा त्यापूर्वी ऑनलाइन नोंदणी करून अपॉइंटमेंट बुक केली आहे, त्यांनी तपासणी दरम्यान बुकिंग पावती दाखवल्यास त्यांच्यावर कारवाई केली जाणार नाही. त्यामुळे अधिकृत पोर्टलवर जाऊन एचएसआरपीसाठी तात्काळ नोंदणी करण्याचे आवाहन आरटीओ प्रशासनाकडून केले आहे.

पुणे आरटीओ कार्यालयाअंतर्गत २०१९ पूर्वीच्या २६ लाख वाहनांपैकी ११ लाख ५७ हजार ६६१ वाहनचालकांनी एचएसआरपीसाठी नोंदणी केली. त्यातील ९ लाख ४६ हजार ३१४ वाहनचालकांनी नंबरप्लेट बसवून घेतली आहे. तर दोन लाख वाहनांना अजून बसविणे बाकी आहे.




### वाहनांवर कारवाई सुरू

» सर्वोच्च न्यायालयाच्या आदेशानुसार १ एप्रिल २०१९ पूर्वीच्या सर्व वाहनांना हाय सिक्युरिटी रजिस्ट्रेशन नंबर प्लेट (एचएसआरपी) बसविणे बंधनकारक आहे. यासाठी राज्य परिवहन विभागाने सहा वेळा मुदतवाढ दिल्यानंतर ३० जून रोजी अंतिम मुदत संपली. त्यानंतर १ जुलैपासून पुणे आरटीओचे वायुवेग पथक आणि वाहतूक पोलिसांनी संयुक्तपणे कारवाई सुरू केली आहे. एचएसआरपी नसलेल्या वाहनचालकांकडून प्रत्येकी एक हजार रुपयांचा दंड वसूल केला जात असून तपासणी मोहीम शहरभर सुरू आहे.